RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक ६१] सोमवार, मे २१, २०१८/वैशाख ३१, शके १९४० [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १०३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय इमारत, मुंबई ४०० ००१, दिनांक १९ मे २०१८.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक (आपना-२०११/प्र.क्र.३८/पापु-१५).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील वरिष्ठ भूभौतिक तज्ञ (गट-अ) (महाराष्ट्र भूजल सेवा) आणि सहाय्यक भूभौतिक तज्ञ (गट-ब) (महाराष्ट्र भूजल सेवा) या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालयातील वरिष्ठ भूभौतिक तज्ञ (गट-अ) आणि सहाय्यक भूभौतिक तज्ञ (गट-ब) (महाराष्ट्र भूजल सेवा) (सेवाप्रवेश) नियम, २०१८, असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, संविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) " संचालक " याचा अर्थ, संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(घ) " संचालनालय " याचा अर्थ, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, संचालनालय, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ड) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

३. शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील संचालनालयातील वरिष्ठ भूभौतिक तज्ञ (गट-अ) (महाराष्ट्र भूजल सेवा) या पदावरील नियुक्ती एकतर—

(क) सहाय्यक भूभौतिक तज्ञ हे पद धारण करणाऱ्या या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या योग्य व्यक्तींमधून योग्यतेनुसार व सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल,—

(एक) ज्याचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नाही परंतु, जे उमेदवार अगोदरच शासकीय सेवेत आहेत, अशा उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने भूभौतिक शास्त्रातील किंवा उपयोजित भूभौतिक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी ; किंवा भूशास्त्र किंवा उपयोजित भूशास्त्र, भौतिकशास्त्र या पर्यायी किंवा दुय्यम विषयांसह बी.एससी आणि भूभौतिक शास्त्राच्या किमान एक किंवा दोन प्रश्नपत्रिकेसह पदव्युत्तर पदवी, किंवा त्यास समकक्ष असल्याचे शासनाने घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, धारण केली आहे ;

(तीन) खाली नमूद केलेला भूभौतिक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव धारण केलेला आहे,—

(ख) पोटकलम (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर शासनाने स्थापन केलेल्या कोणत्याही उद्योग क्षेत्रामध्ये किंवा शासनाच्या कोणत्याही विभागात किंवा औद्योगिक उपक्रमात किंवा महामंडळात किंवा मंडळात किमान ६ वर्षे :

परंतु, भूभौतिक शास्त्र क्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही उद्योगात किंवा संस्थेत जबाबदारीच्या पदावर अनुभव असणाऱ्या आणि ज्याने स्वतंत्र क्षेत्र मोजणी, पूर्वेक्षण, सर्वेक्षण केले आहे किंवा त्यावर पर्यवेक्षण केले आहे आणि भौतिकशास्त्रातील कोणत्याही शाखेत संशोधन प्रबंध प्रकाशित केला आहे अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४. शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणा खालील संचालनालयातील सहाय्यक भूभौतिक तज्ञ (गट-ब) (महाराष्ट्र भूजल सेवा) या पदावरील नियुक्ती एकतर—

(क) कनिष्ठ भूभौतिक तज्ञ हे पद धारण करणाऱ्या व्यक्तीमधून व त्या पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून योग्यतेच्या योग्य व्यक्तीला व सेवाज्येष्ठतेच्या आधारे अधीनतेने पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा

(ख) नामनिर्देशनाद्वारे उमेदवारांमधून,—

(एक) ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नाही; परंतु, जे उमेदवार अगोदरच शासकीय सेवेत आहेत, अशा उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने भूभौतिक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी किंवा भूभौतिक शास्त्र किंवा भूशास्त्र या पर्यायी किंवा दुय्यम विषयांसह बी.एससी पदवी आणि भूभौतिकी शास्त्रांच्या किमान एका प्रश्नपत्रिकेसह भूशास्त्रातील पदव्युत्तर पदवी धारण केली आहे ;

(तीन) या उप नियमाच्या उप खंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर शासनाने स्थापन केलेल्या कोणत्या उद्योगामध्ये किंवा शासनाच्या कोणत्याही विभागात किंवा औद्योगिक उपक्रमात किंवा स्थानिक प्राधिकरणात किंवा महामंडळात तीन वर्षांहून कमी नसेल इतका भूभौतिक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव धारण करत असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

५. पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्ती ही ५०:५० या प्रमाणात करण्यात येईल.

६. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीचा परिवीक्षा कालावधी दोन वर्षांचा असेल. परिवीक्षा कालावधी आणखी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. त्याने किंवा तिने पदासाठी विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि परिवीक्षा काल यशस्वीरीत्या पूर्ण करणे आवश्यक असेल जर त्याने किंवा तिने विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा परिवीक्षा कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण केला नाही किंवा तो किंवा ती पदासाठी योग्य नाही असे आढळून आले तर तो किंवा ती, सेवेतून काढून टाकण्यास पात्र असेल.

७. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने त्याबाबत केलेल्या नियमांनुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा त्याने किंवा तिने अगोदरच सदर परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्याला/तिला सूट मिळालेली नसेल तर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

८. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

९. नियम ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली केली जाण्यास पात्र असेल.

१०. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा रीतीने आवश्यक सेवेची गरज आहे, असे शासनाचे मत झाल्यास, शासनास, आयोगाशी विचारविनिमय करून, ज्या-ज्या वेळी आवश्यक असेल तेव्हा प्रवेशासाठीच्या या नियमात विहित केलेली टक्केवारीची अट शिथिल करून वरिष्ठ भूभौतिक तज्ञ आणि सहाय्यक भूभौतिक तज्ञ या पदावरील नियुक्ती नामनिर्देशनाद्वारे करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्याम लाल गोयल,**

शासनाचे अपर मुख्य सचिव.

## WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT

7th Floor, Gokuldas Tejpal Hospital Complex, New Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 19th May 2018

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA

No. (Aapana-2011/C.R. 38/W.S.-15.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments made in that behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of the Senior Geophysicist (Group A) and the Assistant Geophysicist (Group-B)(Maharashtra Groundwater Service) in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency under the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Senior Geophysicist (Group A) and the Assistant Geophysicist (Group-B) (Maharashtra Groundwater Service) in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency under the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra, (Recruitment) Rules, 2018.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*b*) "degree" means a degree of a statutory University;

(*c*) "Director" means the Director of Groundwater Surveys and Development Agency, Government of Maharashtra;

(*d*) "Directorate" means the Director of Groundwater Surveys and Development Agency, Government of Maharashtra;

(*e*) "Government" means Government of Maharashtra;

(*f*) "Water Supply and Sanitation Department" means the Water Supply and Sanitation Department of the Government.

3. Appointment to the post of the Senior Geophysicist (Group A) (Maharashtra Groundwater Service) in the Directorate under the Water Supply and Sanitation Department of the Government shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of the Seniority subject to fitness from amongst the person holding the post of the Assistant Geophysicist having not less than three years regular service in the post;

or

(*b*) by nomination from amongst the candidates, who-

(*i*) are not more than 40 years of age, provided that, the upper age limit may be relaxed up to 5 years in case of candidates who are already in Government service;

(*ii*) possess a Post-Graduate degree in Geophysics or Applied Geophysics ; or Geology or Applied Geology with physics as one of the optional or subsidiary subject at B.Sc. and at least one or two papers in Geophysics at Post-Graduate degree or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*iii*) possess practical experience in Geophysical works mentioned below :—

(*a*) Minimum 6 years, in any Industry or in a Government Department or in an Industrial undertaking or Corporation or Board established by the Government, gained after acquiring the qualification mentioned in sub-clause *(ii)* ;

Provided that, preference may be given to candidates who possess experience in a responsible post in any industry or institution doing Geophysical field work and who have carried out or supervised independent field mapping, prospecting and surveying and have published papers in any branch of Geophysics.

4. Appointment to the post of the Assistant Geophysicist (Group-B) (Maharashtra Groundwater Service) in the Directorate under the Water Supply and Sanitation Department of the Government shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of the Seniority subject to fitness from amongst the person holding the post of the Junior Geophysicist having not less than 3 years regular service in the post ;

or

(*b*) by nomination from amongst the candidates, who—

(*i*) are not more than 40 years of age, provided that, the upper age limit may be relaxed up to 5 years in case of candidates who are already in the Government service;

(*ii*) possess a Post-Graduate degree in Geophysics or a degree in Bachelor of Science with Physics and Geology at optional or subsidiary level and Post-Graduate Degree in Geology with at least one paper in Geophysics;

(*iii*) possess practical experience in Geophysical work for a period of not less than three years, in any Industry or in any Department of the Government or in an Industrial undertaking or local authority or Corporation or Board established by the Government, gained after acquiring the qualification mentioned in sub-clause (*ii*) of this sub rule.

5. Appointments to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50.

6. A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by nomination shall be on probation for a period of two years. Probation period may be extended maximum upto one year. He or she shall be required to pass the departmental examination prescribed for the post and complete the probation period successfully. If he or she does not pass the prescribed departmental examination or does not complete the probation period successfully or is not found suitable for the post then he or she shall be liable to be terminated from service.

7. A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 shall be required to pass the departmental examinations in Hindi and Marathi language according to the rules made in that behalf, unless he or she has already passed, or has been exempted from passing those examinations.

8. Person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology Government of Maharashtra, from time to time.

9. A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 shall liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

10. Notwithstanding anything contained in these rules, if in the opinion of the Government the exigencies of service so require, the Government may, after consultation with the Commission, wherever necessary make appointment to the post of Senior Geophysicist and Assistant Geophysicist in relaxation of the percentage prescribed in these rules for recruitment, by nomination.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHAM LAL GOYAL,
Additional Chief Secretary to Government.

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय इमारत, मुंबई ४०० ००१, दिनांक १९ मे २०१८.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक (आपना-२०११/प्र.क्र.३८/पापु-१५).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील कनिष्ठ भूभौतिक तज्ज्ञ (गट-क) (महाराष्ट्र भूजल सेवा) या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा संचालनालयातील कनिष्ठ भूभौतिक तज्ज्ञ (गट-क) (महाराष्ट्र भूजल सेवा) (सेवा प्रवेश) नियम, २०१८, असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " पदवी " याचा अर्थ, संविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ख) " संचालक" याचा अर्थ संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे असा आहे ;

(ग) " संचालनालय " याचा अर्थ, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, संचालनालय, असा आहे ;

(घ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ह) " पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, असा आहे.

३. शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील संचालनालयातील कनिष्ठ भूभौतिक तज्ज्ञ (गट-क) (महाराष्ट्र भूजल सेवा) या पदाची नियुक्ती ही—

(एक) ज्याचे वय ३३ वर्षांहून अधिक नाही परंतु, जे आधीच शासकीय सेवेत आहेत, अशा उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत उच्च वयोमर्यादा शिथिल करता येईल,

(दोन) जो भूभौतिकी शास्त्रातील पदव्युत्तर पदवी किंवा भूशास्त्र विषयासह बी.एससी पदवी आणि भौतिक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी धारण करीत आहे :

परंतु ज्यांच्याकडे अपवादात्मक पात्रता किंवा अनुभव आहे किंवा दोन्हीही असेल त्यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करता येईल.

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीचा परिवीक्षा कालावधी दोन वर्षांचा असेल. परिवीक्षा कालावधी जास्तीत जास्त आणखी एक वर्षापर्यंत वाढविता येईल. त्याने किंवा तिने पदासाठी विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि परिवीक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक असेल. जर त्याने किंवा तिने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा परिवीक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही किंवा तो किंवा ती सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आले तर, तो किंवा ती सेवेतून काढून टाकण्यास पात्र असेल.

५. नामनिर्देशनाद्वारे पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने मराठी व हिंदी भाषा परीक्षा त्याने किंवा तिने अगोदरच सदर परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्याला/तिला सूट मिळालेली नसेल तर त्याबाबत केलेल्या नियमांनुसार परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

***श्याम लाल गोयल,***
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT

7th Floor, Gokuldas Tejpal Hospital Complex, New Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 19th May 2018

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. (Apapna-2011/C.R. 38/W.S.-15.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in that behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating the recruitment to the posts of the Junior Geophysicist (Group C)(Maharashtra Groundwater Service) in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency under the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Junior Geophysicist (Group C)(Maharashtra Groundwater Service) in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, under the Water Supply and Sanitation Department of Government of Maharashtra, (Recruitment) Rules, 2018,—

2. In these rules, unless the context requires otherwise,

(*a*) "degree" means a degree of a statutory University;

(*b*) "Director" means the Director of Groundwater Surveys and Development Agency, Maharashtra State, Pune;

(*c*) "Directorate" means the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, Government of Maharashtra.;

(*d*) "Government" means Government of Maharashtra;

(*e*) "Water Supply and Sanitation Department" means the Water Supply and Sanitation Department of Government of Maharashtra.

3. Appointment to the post of the Junior Geophysicist (Group C)(Maharashtra Groundwater Service) in the Directorate under the Water Supply and Sanitation Department of the Government shall be made by nomination from amongst candidates, who,-

(*i*) are not more than 33 years of age, provided that, the upper age limit may be relaxed up to 5 years in the case of candidates who are already in Government service;

(*ii*) possess a Master degree in Geophysics or degree in Bachelor of Science with Geology, as one subject and Master degree in Physics :

Provided that, the upper age limit may be relaxed in the case of those having exceptional qualifications or experience or both.

4. A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall be on probation for a period of two years. Probation period may be extended maximum up to one year. He or she shall be required to pass the departmental examination prescribed for the post and complete the probation period successfully. If he or she does not pass the prescribed departmental examination or does not complete the probation period successfully or is not found suitable for the post then he or she shall be liable to be terminated from service.

5. A person appointed to the post, by nomination, shall be required to pass the Departmental examinations in Hindi and Marathi language according to the rules made in that behalf, unless he or she has already passed, or has been exempted from passing those examinations.

6. A person appointed to the post mentioned in rule 3 should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology Government of Maharashtra, from time to time.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHAM LAL GOYAL,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.